# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ़ परेड, कुलाबा, मुंबई ४०० ००५.
दूरध्वाीः ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फ़ॅक्सः ०२२-२२१६ ३९७६. ई-मेलः mercindia@mercindia.org.in

## प्रसिध्दी- पत्रक

## विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम २३ खाली परवानेधारकांना निदेश

राज्यातील विजेच्या मागणी-पुरवठ्यातील भीतिदायक तफावत विचारात घेता, " विजेचा पुरवठा कार्यक्षम ठेवून विजेच्या समान वाटपाची खात्री करुन घेण्याकरिता" सर्व वितरण परवानाधारकांना निदेश द्यावेत अशी मागणी आयोगाकडे विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम २३ खाली महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. ( महा वितरण)ने केली आहे. प्रत्यक्षात, महा वितरणच्या प्रस्तावात, राज्यातील औद्योगिक व वाणिज्यिक वर्गातील ग्राहकांवर भार व्यवस्थापन आकार तसेच निवडक ग्राहक वर्गाच्या वीज वापरावर निर्बंध घालण्यास, परवानगी मागण्यात आली आहे.

२. महा वितरणच्या दिनांक ६ डिसेंबर, २००५ च्या प्रस्तावावर व दिनांक १४ डिसेंबर, २००५ च्या प्रस्तावावरील सुधारणेवर, जनतेच्या सूचना व अभिप्राय मागविण्यांत आले आणि दिनांक १९ डिसेंबर ते २३ डिसेंबर, २००५ च्या दरम्यान नागपूर, औरंगाबाद व मुंबई येथे जाहीर सुनावण्याही घेण्यांत आल्या.

३. या संबंधांत, आयोगाने दिनांक १७ जानेवारी, २००६ रोजी एक सविस्तर आदेश निर्गमित केला आहे. या आदेशांतील ठळक वैशिष्ट्ये खालील प्रमाणे आहेतः-

(अ) भार व्यवस्थापन आकार (लोड मॅनेजमेंट चार्जेस-एल एम सी) लावल्यास वीज दरात बदल केल्यासारखे होईल म्हणून, एल एम सी लावण्याबाबतचा महा वितरणचा प्रस्ताव आयोगाने नामंजूर केला आहे.

(ब) आयोगाने यापूर्वीच प्रस्तूत केलेल्या भार नियंत्रणाच्या संकल्पनेनुसार, बिगर-सतत प्रक्रिया उच्च दाब उद्योगांना, त्यांचा युनिटसमधील मासिक वीज वापर, मागील तीन महिन्यांच्या सरासरी मासिक वीज वापराच्या ८०% किंवा त्याहून कमी इतक्या मर्यादेत करावा लागेल.

(क) तसेच, सतत प्रक्रिया करणा-या करणा-या उच्च दाब उद्योगांना, त्यांचा युनिटसमधील मासिक वीज वापर, मागील तीन महिन्यांच्या सरासरी मासिक वीज वापराच्या ९०% किंवा त्याहून कमी इतक्या मर्यादेत करावा लागेल.

(ड) जर निर्धारित लक्ष्य फेब्रुवारी, २००६ पर्यंत साध्य झाले नाही तर, संपूर्ण एमआयडीसी क्षेत्राला किंवा त्या विशिष्ट फीडरला, मार्च, २००६ च्या सुरुवातीपासून, आठवड्यांतून आणखी एक दिवस वीज पुरवठ्याशिवाय रहावे लागेल.

(इ) चित्रपटगृहे, महत्वाच्या व्यापारी आस्थापना, दुकाने इत्यादींच्या वीज वापरावर निर्बंध घालण्याचा महा वितरणचा प्रस्ताव, आयोगाने नामंजूर केला आहे, कारण हा प्रस्ताव प्रत्यक्षात अंमलात आणणे शक्य होणार नाही. .

(फ) आयोगाने नुकत्याच जारी केलेल्या भार नियमनाच्या सुधारित कार्यपध्दतीनुसार, शेती प्रभावित विभागांना रोज फक्त १२ ते १३ तास वीज पुरवठा होणार असल्यामुळे, शेती पंपांचा वापर फक्त बिगर-कमाल मागणीच्या काळात करण्याचा महा वितरण्चा प्रस्ताव आयोगाने नामंजूर केला आहे.

(ग) निऑन साइन, जाहिरात फलकांवरील रोषणाई, यांच्या वीज वापरावर निर्बंध घालून भार नियमनात अल्पसा दिलासा मिळणार असला तरी त्यामुळे या टंचाईच्या काळात वीज वापराची उधळपट्टी योग्य नाही, असा संदेश मिळतो, याची आयोगास जाणीव आहे. वीज वापराची उधळपट्टी होते अशा ठिकाणांवर, काटकसरीच्या काळात,लक्ष केंद्रित करण्यांत आले पाहिजे. एकूण महसूलाची गरज (एआरआर) आणि वीज दराचे प्रस्ताव जेव्हा परवानेधारकांकडून मंजूरीसाठी सादर करण्यांत येतील तेव्हा ही बाब लक्षात घेऊन त्यानुसार या संदर्भात आयोग उचित आदेश देईल.

हा आदेश आयोगाच्या (www.mercindia.org.in) या वेब-साइटवर उपलब्ध आहे.

(मालिनी शंकर)
सचिव, मविनिआ

मुंबई,
१७-०१-२००६